# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचा: १. शासन निर्णय क्र. मकृवि१२१५/प्र.क्र.७७/६ए, दि. ४ एप्रिल, २०१५.
२. शासन निर्णय क्र. मकृषि१२१५/प्र.क्र.७७/६-ए, २० फेब्रुवारी, २०२४.

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/०२/२०२४./4298 दिनांक:- ५ मार्च, २०२४.

या विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की,

कृषि विद्यापीठामधील आणि संलग्नित व अनुदानित कृषि महाविद्यालया मधील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात संदर्भ क्र. १ दि. ०४.०४.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे वयावरून ६२ वर्षे वाढ करण्यात आली होती.

आता संदर्भ क्र. २ दि. २०.०२.२०२४ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील कृषिविद्यापीठामधील आणि संलग्नित व अनुदानित महाविद्यालयामधील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, विभाग प्रमुख, सहयोगी अधिष्ठाता, शारीरीक शिक्षण निदेशक, क्रिडा अधिकारी, ग्रंथपाल, अधिष्ठाता आणि संचालक दर्जातील अध्यापकांची नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वर्ष वयावरून ६० वर्ष करण्यात येत आहे.

परीणामी शासननिर्णयातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे असे सर्व सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, विभाग प्रमुख, सहयोगी अधिष्ठाता, शारीरीक शिक्षण निदेशक, क्रिडा अधिकारी, ग्रंथपाल, अधिष्ठाता आणि संचालक ज्या महिन्यात ६० वर्षाचे होतील, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्हानंतर सेवानिवृत्त होतील आणि ज्या अधिकाऱ्यांची जन्मतारीख १ तारखेला असेल असे अधिकारी ६० वर्ष वयाचे होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी माध्यान्हानंतर सेवानिवृत्त होतील.

कृषि व पदुम विभागाच्या संदर्भ क्र. १ मधील दि. ०४.०४.२०१५ च्या शासन निर्णयास अनुसरून ज्या शिक्षकवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांनी सेवानिवृत्तीवयोमर्यादा ६० वर्षावरून ६२ वर्ष केलेल्या निर्णयाचा लाभ घेतलेला आहे, असे ६० वर्षावरील अधिकारी वयाची ६२ वर्षे पुर्ण होताच सेवानिवृत्त होतील.

सदर परिपत्रक विद्यापीठाचे अर्थ प्रशासन विभाग, यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

मा. कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)---------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ------- प्रभारी अधिकारी, संगणक विभाग ----------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

०५/०३
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.